# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : मंगळवार दिनांक 17 डिसेंबर 1996
**स्थळ** : कोतवाल उद्यान, प्लाझा सिनेमा समोर, दादर – पश्चिम, मुंबई – 400 028.

उपरोक्त संस्थेची सभा वीर कोतवाल उद्यान, प्लाझा सिनेमा समोर, दादर येथे दिनांक 17 डिसेंबर 1996 रोजी सायंकाळी 6:00 वाजता आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी खालील 8 सभासद उपस्थित होते.

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 3. श्री भास्कर दौलत राणे |
| 2. श्री उदय भगवान राणे | 6. श्री दिलीप मधुकर राणे |
| 3. श्री मेघश्याम नारायण राणे | 7. श्री वासुदेव बाबू राणे |
| 4. श्री प्रताप विठोबा राणे | 8. श्री दत्ताराम विष्णु साटम |

या बैठकीत विशेषत: आमदार श्री नारायण तातू राणे यांचा सत्कार, वाडीतील पाणीप्रश्न व वाडीतील सभासदांमध्ये एकता का नाही या बद्दल चर्चा करण्यात आली.

वाडीतील सभासद लग्नप्रसंगी सोडल्यास सार्वजनिक कामामध्ये सहभागी होत नाहीत. त्यामुळे काम करण्यास उत्साह येत नाही यावर साधक-बाधक चर्चा झाल्यानंतर संस्थेचे खजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी अशी सूचना केली की येत्या 3 तारखेस श्री दत्ताराम विष्णु साटम यांच्या चिरंजिवांचे लग्न आहे. या लग्नप्रसंगी सर्व सभासद उपस्थित होतील त्या सर्वांना परिपत्रक देऊन 06 जानेवारी 21996 रोजी दुसऱ्या एका लग्नप्रसंगी परिपत्रकाव्दारे आवाहन करून सभा आयोजित करावी या विषयासंबधी विचार घ्यावा जेणेकरून वाडीतील सर्व प्रश्न त्याठिकाणी चर्चेला येतील असे ठरले.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

---